ePaper
अयोध्येत मंत्र्यांच्या यज्ञादरम्यान थरार! नारळाचा स्फोट होऊन यज्ञशाळेला भीषण आग



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 29 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पुणे महापालिकेत 2000 कोटींच्या प्रकल्पांवरून वादंग

पान 2 वरुन...

## भारताच्या आणखी 2 LPG टँकर्सना होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडण्याची इराणकडून परवानगी

# कुवेतहून ४७,००० टन एलपीजी घेऊन येणारं 'जगवसंत' भारतात दाखल

**महाईन्यूज I नवी दिल्ली**

इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका युद्धामुळे भारताच्या गॅस आणि तेल आयातीवर परिणाम झाला आहे. अशातच भारतासाठी चांगली बातमी आली आहे. ४७००० मेट्रिक टन एलपीजी घेऊन जग वसंत जहाज भारतात दाखल झाले आहे. त्याचबरोबर एलपीजी आणि पेट्रोलियम पदार्थ घेऊन भारताच्या दिशेने दोन जहाजे रवाना झाली आहेत. ही दोन्ही जहाजे होर्मुझ सामुद्रधुनी पार करत आहेत, अशी माहिती समोर आली आहे.




जग वसंत हे गॅस जहाज एलपीजी गॅस घेऊन शनिवारी भारतात पोहोचले. हे जहाज गुजरातमधील जामनगरमध्ये असलेल्या कांडला वादीनगर टर्मिनलवर पोहोचले आहे. हे जहाज ४७००० मेट्रिक टन एलपीजी घेऊन आले आहे. या जहाजातून एलपीजी दुसऱ्या जहाजांमध्ये भरला असून, तिथून देशाच्या इतर भागात पाठवला जाणार आहे.

वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, जहाज वाहतूक आणि जल मार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी सांगितले की, मागील २४ तासांत आखाती क्षेत्रातून भारतीय जहाज किंवा नावाड्यांसोबत कोणतीही दुर्दैवी घटना घडलेली नाही.

फारस खाडीमध्ये सध्या भारतीय ध्वज असलेली २० जहाजे सध्या आहेत. त्या जहाजांवर ५४० भारतीय आहेत. हे सर्व कर्मचारी सुरक्षित आहेत.




## दोन जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये

इराण-इस्रायलमध्ये हल्ले सुरू असतानाच भारताची दोन जहाजे रवाना झाली आहेत. हे दोन जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीत पार करत असल्याची माहिती समोर आली आहे. या जहाजांच्या सुरक्षिततेसाठी नौदल अलर्ट मोडवर ठेवले आहे. फारस खाडी आणि आजूबाजूच्या परिसरात युद्धनौका तैनात करण्यात आल्या आहेत. या युद्धनौका जहाजाच्या सुरक्षिततेसाठी तैनात केल्या गेल्या आहेत.

## होर्मुझची सामुद्रधुनीतून भारताची सुमारे ५०% ऊर्जा आयात

भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांपैकी ९०% आयात करतो. आता भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना इराणकडून मिळालेल्या परवानगीमुळे भारताला एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यास मदत होणार आहे. होर्मुझची सामुद्रधुनी भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण भारताची सुमारे ५०% ऊर्जा आयात याच मार्गातून होते. गेल्या दोन आठवड्यांत या जलमार्गातील सागरी वाहतूक अत्यंत कमी झाल्यामुळे भारताला स्वयंपाकाच्या गॅसच्या पुरवठ्यात अडचणींचा सामना करावा लागला. यामुळे घरगुती वापरकर्त्यांनी घाबरून सिलिंडर खरेदी करण्यास सुरुवात केली आणि काही रेस्टॉरंटना तात्पुरते बंद ठेवण्यास किंवा त्यांच्या मेनूमध्ये कपात करण्यास भाग पडले. मात्र, आता इराणने भारतीय टँकरना येथून जाण्याची परवानगी दिल्याने येत्या काही आठवड्यांत परिस्थितीत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

# महापालिकेत 2000 कोटींच्या प्रकल्पांवरून वादंग

## स्थायी समितीत ‘72 ब’ प्रकल्पांवर प्रश्नचिन्ह; निधी क्षमतेवर विरोधकांचा आक्षेप

**महाईन्यूज । पुणे**

**क्षमता नसताना महापालिकेने तब्बल दोन हजार कोटींचे ‘72 ब’ अंतर्गत प्रकल्प स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवले होते. परंतु, या प्रकल्पांसाठी पैसे देण्याची क्षमता महापालिकेकडे आहे का? असा प्रश्न उपस्थित करत गेल्या सहा महिन्यांत प्रशासनाने ‘72 ब’ आणि ‘67 क’ चे किती विषय मंजूर केले, याची माहिती विरोधकांनी स्थायी समितीच्या बैठकीत प्रशासनाला मागितली.**



महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत चांदणी चौक ते भूगाव रस्त्यासह आणखी काही ‘72 ब’ चे प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवले होते. या रस्त्याच्या दायित्वाची रक्कम 200 कोटींपर्यंत गेल्याने विरोधकांनी यावर प्रश्न उपस्थित केले. कॉंग्रेस सदस्य प्रशांत जगताप यांनी महापालिकेची दायित्व घेण्याची क्षमता आहे का? सभागृहाने ही चुकीची प्रथा पाडू नये. नियमानुसार दायित्व घेताना प्रकल्पाची 50 टक्के रक्कम मंजूर असणे अपेक्षित आहे.

प्रशासनाने तब्बल 2 हजार कोटी रुपयांचे ‘72 ब’ चे प्रकल्प आणले असून, तेवढी रक्कम महापालिका कोठून आणणार? असा सवाल केला. गेल्या काही दिवसांपासून प्रशासनाने निधी नसताना दायित्व घेण्याची चुकीची प्रथा पाडली आहे, असा आक्षेप त्यांनी घेतला. तसेच, गेल्या 6 महिन्यांत ‘72 ब’ आणि ‘67 क’ चे किती प्रस्ताव मान्य करण्यात आले, याची माहिती प्रशासनाला देण्यास सांगितले.

स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी देखील हे चुकीचे असल्याचे मत मांडत अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांना प्रशासनाने किती प्रस्ताव मंजूर केले, याची माहिती देण्यास सांगितले. तसेच, चांदणी चौक ते भूगाव रस्त्याचा प्रस्ताव पुढच्या सभेसाठी घेण्यात आला.

### भाजप नगरसेवकाचे भाषण

स्थायी समितीचे सभासद नसताना भाजपचे नगरसेवक दिलीप वेडेपाटील हे सभेत उपस्थित होते. या सभेत सभासदांव्यतिरिक्त इतरांना बोलण्याची परवानगी नसते. मात्र, दिलीप वेडेपाटील यांनी बैठीत मुद्दे मांडल्याने विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये खडाजंगी झाली. बैठकीची परंपरा का मोडत आहात? नवे नियम का सुरू केले जातात, असे म्हणत दोन्ही बाजूंनी वादावादी झाली.

# पुणे जिल्हा परिषदेला ई-गव्हर्नन्समध्ये राज्यात प्रथम क्रमांक

**महाईन्यूज । पुणे**

**मुख्यमंत्री यांच्या१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत झालेल्या मूल्य मापनात पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६.२५ गुण प्राप्त करुन राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे; सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषदेची 'प्रथम' क्रमांकाने निवड झाली आहे. आज मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.**



> डिजिटल प्रशासन ही काळाची गरज आहे. पुणे जिल्हा परिषद नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासवासाठी सतत प्रयत्नशील राहील आणि राज्यातच नव्हे तर देशातही एक आदर्श मॉडेल म्हणून उभी राहील
>
> - श्री. गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

मुख्यमंत्री यांच्या१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील शासकीय कार्यालयांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये सात महत्त्वाच्या घटकांवर- कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड करण्यात आली.

श्री. गजानन पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून जिल्हा परिषदेने डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात अभिनव उपक्रम राबवून नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व जलद सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. जिल्हा परिषदेकडून INTEGRATED WORKS MANAGEMENT SYSTEM (IWMS), 'स्पंदन', ई-लॉटरी, SYSTEM OF PENSION ILLUSTRATION (SOPI), क्यूआर कोड आधारित कर संकलनप्रणाली यांसारख्या नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या असून, यामुळे प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक झाले आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ हे द्विभाषिक, सुरक्षित व सुलभ असून नागरिकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते. 'आपले सरकार' प्रणालीत १०० टक्के सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ई-ऑफिस प्रणालीमुळे कागदविरहित प्रशासनाला गती मिळाली असून हजारो नस्ती जलद निकाली काढण्यात आल्या आहे. तसेच इंटिग्रेटेड स्मार्ट डॅशबोर्डद्वारे डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया सक्षम झाली आहे.

'PUNE ZP SAMVAAD' या व्हॉट्सअॅप AI चॅटबॉटद्वारे नागरिकांना २४X७ माहिती व सेवा मिळत आहेत. एआय, ब्लॉकचेन आणि जीआयएस तंत्रज्ञानाचा वापर करून मालमत्ता व्यवस्थापन, आरोग्य सेवा व विकास नियोजन अधिक प्रभावी करण्यात आले आहे.

### सेवाकर्मी कार्यक्रमातही विशेष कामगिरी

सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये 'विशेष प्रशंसनीय' म्हणून निवड होणे ही जिल्हा परिषदेच्या सेवा गुणवत्ता, नागरिक समाधान, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि डिजिटल सेवा विस्ताराची पावती मानली जात आहे. १५० दिवसांच्या कार्यक्रमातील यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, प्रकल्प संचालक शालिनी कडू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाच्या सादरीकरणात व सर्व घटकांच्या एकत्रीकरणात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल सामान्य प्रशासन विभाग व त्याच्या टीमचेही त्यांनी अभिनंदन केले.

# पिंपरी-निगडी मेट्रो विस्ताराचा खर्च वाढला

## टिळक चौक स्टेशनमुळे महापालिकेवर अतिरिक्त भार; प्रकल्पाचा खर्च 960 कोटींवर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते निगडी या मार्गावर मेट्रो विस्तारीत मार्गाचे काम सुरू आहे. या मार्गावर निगडी येथील टिळक चौकात नवीन चौथे मेट्रो स्टेशन बांधण्यात येत आहे. त्या प्रकल्पाचा महापालिका हिस्सा 121 कोटी 97 लाख रुपये आहे. तसेच, नव्या मेट्रो स्टेशनसाठी 25 कोटी रुपयांचा हिस्सा वाढला आहे, असे एकूण 146 कोटी 97 लाख रुपयांचा आर्थिक भार महापालिकेवर आहे. त्यापैकी पूर्वीच 49 कोटी रुपये महामेट्रोला देण्यात आले आहेत. नुकतेच 50 कोटी रुपयेही देण्यात आले आहेत.**



शहरात दापोडी ते पिंपरी या मार्गावर मेट्रो धावत आहे. पिंपरीपासून निगडी येथील भक्ती-शक्ती समुह शिल्प चौकापर्यंत 4.413 किलोमीटर अंतरापर्यंत मेट्रोच्या विस्तारीत मार्गाचे काम सध्या सुरू आहे. या एकूण 910 कोटी 18 लाख रुपये खर्चास केंद्राच्या गृह निर्माण व शहरी विकास मंत्रालयाचे 23 ऑक्टोबर 2023 ला मंजुरी दिली आहे. त्या प्रकल्पात चिंचवड स्टेशन, आकुर्डीतील खंडोबा माळ चौक आणि निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक असे तीन मेट्रो स्टेशन होते. नागरिकांची मागणी लक्षात घेऊन निगडी येथील टिळक चौकातील चौथ्या मेट्रोस स्टेशनच्या वाढीव 50 कोटी खर्चाला 10 मार्च 2026 ला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढून 960 कोटी 18 लाख रुपयांवर पोहचला आहे.

दरम्यान, या मार्गावरील बहुतांश सर्व पिलर उभारण्यात आले आहेत. व्हाया डक्ट उभारण्यात येत आहेत. आतापर्यंत 55 टक्के काम पूर्ण झाले आहे. महापालिका एकूण 147 कोटी 97 लाख रुपयांची रक्कम महामेट्रोला देणार आहे. त्यापैकी 49 कोटी रुपये महापालिकेकडून 24 ऑक्टोबर 2024 ला देण्यात आले आहेत. महामेट्रोने26 जून 2025 च्या पत्रानुसार 35 कोटी रुपयांची मागणी केली आहे. तसेच, टिळक चौकातील मेट्रो स्टेशनसाठी 10 मार्च 2026 च्या पत्रानुसार 25 कोटी रुपये मागितले आहेत. असे एकूण 60 कोटी रुपये महामेट्रोला द्यायचे आहेत. महापालिकेच्या सन 2025-26 च्या अर्थसंकल्पास मेट्रोसाठी 50 कोटीची तरतूद केली आहे. त्यातून 50 कोटी रुपये महामेट्रोला देण्यात आले आहेत. महापालिकेने आत्तापर्यंत 99 कोटी रुपये महामेट्रोला दिले आहेत. महापालिकेस अजून शिल्लक 47 कोटी 97 लाख रुपये महामेट्रोला द्यावे लागणार आहेत.

### महापालिकेवर सर्वाधिक आर्थिक भार

पिंपरी ते निगडी मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र सरकार 67 कोटी 2 लाख आणि राज्य सरकार 79 कोटी 8 लाख रुपये अनुदान देणार आहे. तर, महापालिकेचा हिस्सा सर्वाधिक 121 कोटी 97 लाख रुपये इतका आहे. उर्वरित 402 कोटी 11 लाखांचा निधी कर्जातून महामेट्रोकडून उभा केला जाणार आहे. तसेच, महापालिका भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहतीकरण आणि बांधकाम कालावधीतील व्याजाकरिता महापालिका 137 कोटी 87 लाख रुपये देणार आहे. चौथ्या मेट्रो स्टेशनचा खर्च निम्मा निम्मा म्हणजे प्रत्येकी 25 कोटी रुपये राज्य सरकार व महापालिका करणार आहे. या प्रकल्पात महापालिकेचा एकूण हिस्सा 284 कोटी 84 लाख रुपये इतका आहे.

### पिंपरी ते निगडी मेट्रो मार्ग

- महापालिकेचा हिस्सा-121 कोटी 97 लाख रुपये
- टिळक चौक मेट्रो स्टेशनचा हिस्सा-25 कोटी रुपये
- महापालिकेचा एकूण हिस्सा-146 कोटी 97 लाख रुपये
- महामेट्रोस दिलेली एकूण रक्कम-99 कोटी रुपये
- देणे असलेली उर्वरित रक्कम-47 कोटी 97 लाख रुपये
- महापालिकडून देण्यात आलेल्या जागांची किमत- 137 कोटी 87 लाख रुपये

# डॉक्टरांच्या अडचणी सोडविण्यासाठी महापौर रवि लांडगे यांचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील नागरिकांना दर्जेदार व तत्पर आरोग्यसेवा मिळण्यासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांना सुलभ, पारदर्शक आणि सहकार्यपूर्ण प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून अधिक परिणामकारक प्रणाली उभारण्यासाठी महानगरपालिका सकारात्मक पावले उचलेल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांच्या प्रशासकीय व नोंदणीसंदर्भातील अडचणींवर चर्चा करण्यासाठी दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, माजी महापौर व नगरसदस्या डॉ. वैशाली घोडेकर, नगरसेवक कुशाग्र कदम, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध डॉक्टर संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभागृह नेते प्रशांत शितोळे म्हणाले की, शहरातील नागरिकांना प्राथमिक स्तरावर तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांच्या कामकाजातील प्रशासकीय अडचणी कमी करून नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करणे गरजेचे आहे. डॉक्टर आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील राहील.

बैठकीदरम्यान डॉक्टरांनी नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, कागदपत्रांची पूर्तता, विविध विभागांशी समन्वय, प्रशासकीय विलंब तसेच तांत्रिक अडथळ्यांविषयी आपली मते मांडली. महापौर रवि लांडगे यांनी सर्व मुद्दे संयमाने ऐकून घेत प्रशासनास आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश दिले. नोंदणी प्रक्रिया अधिक सोपी, सुसंगत व पारदर्शक करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. डॉक्टरांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागू नयेत, तसेच सर्व प्रक्रिया सुलभ पद्धतीने पूर्ण व्हावी यासाठी सकारात्मक पावले उचलण्याबाबत चर्चा झाली.

शहरातील आरोग्य व्यवस्थेत खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व क्लिनिक चालक डॉक्टरांचे योगदान महत्त्वपूर्ण असून नागरिकांना प्राथमिक स्तरावर त्वरित सेवा उपलब्ध करून देण्यात त्यांची भूमिका मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या कामकाजात अनावश्यक अडथळे येऊ नयेत, यासाठी महानगरपालिका सहकार्याची भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



## भूमिका

**इराणने भारत, चीन, रशियासह काही मित्र देशांना होर्मुझ सामुद्रधुनीतून व्यापार जहाज वाहतुकीस परवानगी देण्याचा घेतलेला निर्णय दिलासादायक ठरला आहे. पर्शियन आखात आणि ओमानच्या आखातादरम्यान असलेली ही अरुंद सामुद्रधुनी जागतिक अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी मानली जाते.**

# रात्रंदिन आम्हा...



जगातील सुमारे 20 टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक या मार्गातून होते. त्यामुळे काही दिवसांपूर्वी येथे वाहतूक ठप्प झाल्याने भारतासह जगभरात अस्वस्थता निर्माण झाली होती.

गॅसचा तुटवडा नसल्याचा सरकारी दावा असला, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी बुकिंग करूनही 15-20 दिवस सिलिंडर मिळत नसल्याच्या तक्रारी समोर आल्या. काळ्या बाजारालाही ऊत आला आणि घरगुती गॅसचे दर तीन ते चार हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याचे चित्र दिसले. व्यावसायिक सिलिंडरची टंचाई वाढल्याने अनेक छोटे उद्योग आणि व्यवसाय अडचणीत आले. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या खर्चावर अतिरिक्त ताण पडला. जर होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक आणखी काही दिवस बंद राहिली असती, तर आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली असती, हे नाकारता येत नाही.

पश्चिम आशिया हा भारताच्या तेल आणि वायू पुरवठ्याचा प्रमुख स्रोत आहे. भारताचे इराणशी ऐतिहासिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण संबंध राहिले आहेत. जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर इराणने भारताला पाठिंबा दिला आहे, तर भारतानेही कठीण काळात इराणशी सख्य टिकवून ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर इराणने मित्र राष्ट्रांना जहाज वाहतुकीची परवानगी देणे हे राजनैतिक दृष्ट्या महत्त्वाचे पाऊल मानावे लागेल. भारताने केलेल्या सातत्यपूर्ण राजनैतिक प्रयत्नांनाही यश मिळाल्याचे दिसते.

मात्र, पश्चिम आशियातील संघर्ष अद्याप थांबलेला नाही. इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव कायम असून, अमेरिकेकडूनही आक्रमक भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे युद्ध लवकर संपेल, अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरेल. सध्या मार्ग खुला झाला असला, तरी परिस्थिती पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी युद्ध संपणे आवश्यक आहे. हा संघर्ष दीर्घकाळ चालला, तर जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

अशा संकटाच्या काळात अफवा आणि साठेबाजी परिस्थिती अधिक बिकट करतात. पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा लागणे किंवा काही पंप बंद राहणे यामुळे लोकांमध्ये भीती निर्माण होते. व्यापारी, दलाल आणि काही एजन्सीचालक संधी साधून नफेखोरी करतात, तर सर्वसामान्य नागरिक महागाईच्या ओझ्याखाली भरडले जातात. म्हणूनच सरकारसमोर दुहेरी आव्हान उभे आहे—पुरवठा साखळी सुरळीत ठेवणे आणि काळ्या बाजारावर कठोर कारवाई करणे.

केंद्र सरकारने देशात किमान 60 दिवसांचा इंधनसाठा असल्याचा दावा केला आहे. परंतु, जर प्रत्यक्षात टंचाई जाणवत असेल, तर त्यामागील कारणांचा सखोल तपास होणे आवश्यक आहे. बुकिंगनंतर चार दिवसांत गॅस मिळेल, अशी घोषणा केली जाते; मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

आजचे जग परस्परावलंबी आहे. कोणताही देश पूर्णपणे आत्मनिर्भर नाही. एका देशातील संघर्षाचा परिणाम संपूर्ण जगावर होतो, हे कोरोनासारख्या महामारीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सध्याचा काळ हा कसोटीचा आहे. तुकोबारायांच्या “रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग” या ओळी आजच्या परिस्थितीचे अचूक वर्णन करतात. हे युद्ध जितक्या लवकर संपेल, तितकेच जगासाठी हितावह ठरेल.

## प्रासंगिक »

### जोतीष्याची फजिती

**एका नगरात एक भामटा ज्योतिषी दररोज एका रस्त्याच्या कडेला बसून लोकांचे भविष्य सांगत असायचा. दररोज तो समोर जन्मकुंडल्या घेऊन एक महान ज्योतिषी आणि हस्तरेखा तज्ञ असल्याचे लोकांसमोर सांगत असायचा.**

लोकही त्याला आपले भविष्य विचारत. मग तो त्यांचे भविष्य सांगून त्यांना खुश करीत असायचा. अशा प्रकारे त्याने अमाप धनदौलत कमावली एके दिवशी तो लोकांचे भविष्य सांगण्यात गुंतला असताना एक व्यक्ती त्याच्याकडे पळत-पळत येतो आणि म्हणतो की , तुमच्या घरामध्ये चोरी झाली आहे त्यावर तो आपल्या घराकडे जात असताना मध्येच त्याला एक व्यक्ती अडवतो आणि अशाप्रकारे धावण्याचे कारण विचारतो. यावर तो ज्योतिषी स्वतःच्या घरी चोरी झाल्याचे सांगतो .यावर तो व्यक्ती म्हणतो , ही गोष्ट अतिशय आश्चर्यकारक आहे की, जो व्यक्ती दुसऱ्या लोकांचे दुर्भाग्य ओळखतो . त्याला स्वतःच्या दुर्भाग्याबद्दल माहित नाही. यावर तो ज्योतिषी शरमेने मान खाली घालतो आपला घमंडी ,भामटेपणा लोकांसमोर व्यक्त करत असतो.

- तात्पर्य :


ज्योतिष, भविष्य सांगणार्यावर विश्वस ठेऊ नये.

इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर युद्धविरामाबाबत पडद्यामागे वाटाघाटी सुरू असल्याचा अमेरिकेचा दावा इराणने स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला आहे. इराणची भूमिका तत्त्वनिष्ठ आणि ठाम असल्याचे त्यांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी सांगितले आहे.

# पाकिस्तानचे दलालीचे धंदे!

दुसरीकडे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चर्चेसाठी तयार न झाल्यास गंभीर परिणामांची धमकी दिली आहे. युद्धविराम असतानाही इराण आणि इस्रायल यांच्यातील हल्ले सुरूच असल्याने परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण कायम ठेवत इराणने आपली ताकद दाखवून दिली आहे.

या संघर्षात मध्यस्थी करण्यासाठी पाकिस्तान पुढे येत असल्याचे चित्र दिसत आहे. अमेरिकेने पाठवलेल्या प्रस्तावाची प्रत पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी इराणकडे नेल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान आणि लष्करप्रमुख यांनी मध्यस्थीची तयारी दर्शवली असली, तरी भारताने स्पष्ट भूमिका घेत स्वतःला पाकिस्तानप्रमाणे ‘दलाल’ मानत नसल्याचे ठामपणे सांगितले आहे. भारतासाठी आखाती देशांमधील भारतीयांची सुरक्षा आणि देशांतर्गत ऊर्जासुरक्षा हेच सर्वोच्च प्राधान्य



असल्याचे केंद्र सरकारने अधोरेखित केले आहे.

इतिहास पाहिला, तर पाकिस्तानने अनेकदा महासत्तांच्या हितासाठी मध्यस्थाची भूमिका बजावली आहे. 1971 च्या बांगलादेश मुक्ती संग्रामाच्या काळात अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घेतली होती. अफगाणिस्तानात सोव्हिएत संघाविरुद्धच्या संघर्षातही अमेरिकेने पाकिस्तानचा वापर करून धर्मांध शक्तींना मदत केली. त्यातूनच तालिबान आणि अल कायदासारख्या दहशतवादी संघटनांचा उदय झाला. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानची मध्यस्थी ही स्वार्थी आणि अविश्वसनीय ठरल्याची टीका वारंवार होत आली आहे.

आजही पाकिस्तान अंतर्गत समस्यांनी ग्रासलेला असताना जागतिक संघर्षात मध्यस्थी करण्याची त्याची धडपड ही स्वतःची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न म्हणून पाहिली जाते. आर्थिक संकट, दहशतवाद आणि राजकीय अस्थिरता यांसारख्या गंभीर प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्व मिळवण्याचा हा प्रयत्न आहे.

जागतिक संघर्षाच्या या संवेदनशील टप्प्यावर जबाबदार भूमिका घेणे आवश्यक आहे. मध्यस्थी ही विश्वासार्हता, स्थैर्य आणि नैतिक ताकद यांवर अवलंबून असते. त्यामुळे स्वतःच्या घरातील प्रश्न सोडविण्याऐवजी इतरांच्या वादात उडी घेणे हे कोणत्याही देशासाठी योग्य ठरणार नाही. पाकिस्ताननेही प्रथम स्वतःची परिस्थिती सुधारण्यावर भर द्यावा, हीच काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भरती मैदानावरच काळाचा घाला! पुण्यात पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा मृत्यू...

## १६०० मीटर धावताना २३ वर्षीय उमेदवार कोसळला; पोलीस होण्याचे स्वप्न अधुरे**

**महाईन्यूज । पुणे**

**पोलीस भरती दरम्यान मैदानी चाचणीत धावताना एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शिवाजीनगर पोलीस मुख्यालयातील मैदानावर शनिवारी सकाळी घडली. सोळाशे मीटर धावण्याची चाचणी देत असताना अचानक त्याला 'फिट' आली. मैदानात बेशुद्ध होऊन कोसळल्यानंतर त्याला तातडीने रुग्णलयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.**

पुरुषोत्तम बारकुल (वय २३, रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे.

पुणे शहर दलातील भरती प्रक्रिया गेल्या महिन्याभरापासून सुरू आहे. शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयातील मैदानावर मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. शनिवारी सकाळी मैदानी चाचणी सुरू झाली. पुरुषोत्तम बारकुल हा मैदानी चाचणीत सहभागी झाला. भरती प्रक्रियेतील १६०० मीटर धावण्याची चाचणी ही कठीण मानली जाते. पुरुषोत्तम याने मैदानाला दोन फेऱ्या मारल्या, तिसऱ्या फेरीत अचानक त्याला अपस्माराचा झटका (फिट) आली. तो धावताना मैदानावरच कोसळला. त्याच्याबरोबर असलेल्या उमेदवारांच्या लक्षात हा प्रकार आला.




भरती प्रक्रियेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या लक्षात हा प्रकार आला. मैदानावर उपस्थित असलेल्या वैद्यकीय पथकाने त्याची प्राथमिक तपासणी केली. त्याच्या हृदयाचे ठोके मंद झाल्याचे निदर्शनास आले. त्याला तातडीने ससून रुग्णलयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच तो मरण पावल्याचे ससूनमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

### पोलीस होण्याचे स्वप्न

पुरुषोत्तम बारकुल हा पोलीस होण्याचे स्वप्न बाळगून पुणे पोलिसांच्या भरती प्रक्रियेत सहभागी झाला होता. भरती प्रक्रियेसाठी त्याने तयारी केली होती. मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजाचा रहिवासी असलेल्या पुरुषोत्तम याचा भरती प्रक्रियेत धावताना मृत्यू झाल्यानंतर हळहळ व्यक्त करण्यात आली. याबाबतची माहिती त्याच्या कुटुंबीयांना पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. त्याचे कुटुंबीय शोकाकूल झाले. त्याचे कुटुंबीय पुण्याकडे रवाना झाले.

---

# प्रेमसंबंधाला विरोध; पित्याला विष देऊन हत्या, कॉन्स्टेबल जोडी अडचणीत

**महाईन्यूज । चंद्रपूर**

**प्रेमसंबंधाला विरोध करणाऱ्या पित्याची विष देऊन हत्या केल्याच्या खळबळजनक प्रकरणाचा तपास आता तांत्रिक वळणावर आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आशिष शेडमाके आणि आर्या बाल्लावार या दोघांचेही व्हॉइस सॅम्पल्स पोलिसांकडून घेण्यात आले असून, ते नागपूर येथील न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.**




पोलिसांनी आरोपींचे मोबाइल फोन आधीच जप्त केले आहेत. तीन वर्षापूर्वी रचलेला हा कट आणि त्या दरम्यान झालेली संभाषणे यांचे धागेदोरे मिळविण्यासाठी हे व्हॉइस सॅम्पलिंग अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. प्रयोगशाळेचा अहवाल या खटल्यात मुख्य प्रगता ठरू शकतो.

**शवविच्छेदन अहवाल आणि 'व्हिसेरा'वर मदार**

मृत जयंत बाल्लावार यांच्या शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे नेमके कारण काय होते. याबाबतही पोलिस तपास करीत आहेत. त्यामुळे पोलिसांनी आता रासायनिक विश्लेषणाद्वारे विषबाधेची पुष्टी करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

या प्रकरणात पोलिसांनी प्रियकर कॉन्स्टेबल आशिष महेश शेडमाके, कॉन्स्टेबल मुलगी आर्या जयंत बाल्लावार चैतन्य उर्फ मॉंटी सचिन गेडाम या तिघांना अटक केली आहे.

तिघांनाही पोलिसांनी शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता, न्यायाधीशांनी एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती एडीपीओ प्रमोद चौगुले यांनी दिली.

### दोघांचेही खाकी सेवेचे स्वप्न अर्धवट

कॉन्स्टेबल आशिष शेडमाके नोकरीवर रुजू झाल्यानंतर त्याचे दोन-तीन वादग्रस्त प्रकरण पुढे आले. त्यामुळे पोलिस अधीक्षकांनी त्याला बडतर्फ केले होते. मात्र, आता तो पुन्हा लवकरच रुजू होणार होता. त्यातच हे प्रकरण पुढे आले, तर कॉन्स्टेबल आर्या बाल्लावार हिने २३ मार्च २०२६ रोजी पासिंग आऊट परेड पूर्ण केली होती. मात्र, दोन दिवसांनंतर हत्येचे प्रकरण पुढे आल्याने तिच्या खाकी वर्दीचे स्वप्न अर्धवटच राहिले आहे.

# होर्मुझ सामुद्रधुनी कोणत्या देशांसाठी असणार खुली?

## मित्रराष्ट्रांना मार्ग खुला तर अमेरिकेसह काही देशांना इशारा; टोल आकारणीच्या चर्चांमध्ये संभ्रम

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कुवेतमधील 'मिना अल-अहमदी रिफायनरी' येथून एलपीजी घेऊन 'जग वसंत' हे जहाज शुक्रवारी (२७ मार्च) भारतात दाखल झाले. हे जहाज होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे सुरक्षितपणे भारतात पोहोचल्याने दिलासा मिळाला असला, तरी या सामुद्रधुनीत वाढलेल्या तणावामुळे जागतिक तेल व नैसर्गिक वायू पुरवठ्यावर मोठा परिणाम होत आहे.**




इराण-इस्रायल संघर्षानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत अंशतः नाकाबंदी लागू केली आहे. या सामुद्रधुनीतून जगातील सुमारे २० ते २५ टक्के तेल व वायू वाहतूक होते. मात्र सध्या येथे जहाजांची वर्दळ मोठ्या प्रमाणात घटली असून, पूर्वी दररोज १३० हून अधिक जहाजे जात असताना आता केवळ ३ ते ४ जहाजेच मार्गक्रमण करत आहेत. तसेच २० हून अधिक व्यापारी जहाजांवर हल्ले झाले असून, सुमारे २००० जहाजे या परिसरात अडकून पडल्याची माहिती समोर आली आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, भारत, चीन, रशिया, इराक आणि पाकिस्तान यांसारख्या मित्रराष्ट्रांना होर्मुझ सामुद्रधुनीतून जाण्यास परवानगी देण्यात आली आहे. आवश्यक असल्यास या देशांच्या जहाजांना सुरक्षा देखील पुरवली जात आहे. मात्र अमेरिका, इस्रायल व त्यांच्या सहयोगी देशांच्या जहाजांना कठोर इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांकडून २ दशलक्ष डॉलर टोल आकारला जात असल्याच्या चर्चांना इराणने फेटाळले आहे. भारतातील इराणी दूतावासाने हे दावे खोटे असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही काही आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार, 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोर्प्स' (IRGC) कडून सामुद्रधुनीत 'टोल बुथ सिस्टिम'सारखी व्यवस्था उभारण्यात आली असून, जहाजांची तपासणी, माहिती संकलन व मार्गदर्शन केले जात आहे.

या प्रक्रियेत जहाज ऑपरेटर्सना मध्यस्थांमार्फत IRGC शी संपर्क साधावा लागत असून, जहाजाची संपूर्ण माहिती व क्रू यादी द्यावी लागते. त्यानंतर संबंधित जहाजाला पुढील मार्ग दिला जातो आणि सुरक्षा म्हणून लहान युद्धनौका देखील तैनात केली जाते.

एकूणच, होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर मोठे परिणाम होत असून, आगामी काळात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### होर्मुझ सामुद्रधुनीचा तणाव वाढला

इराण-इस्रायल संघर्षानंतर होर्मुझ सामुद्रधुनीत अंशतः नाकाबंदी लागू झाली असून जागतिक तेल व वायू पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. मित्रराष्ट्रांना मार्ग खुला ठेवत इराणने अमेरिकेसह काही देशांना इशारा दिला आहे, तर टोल आकारणीबाबत संभ्रम कायम असून IRGC कडून जहाजांवर नियंत्रण व सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

# आकाशात संकट, धावपट्टीवर दिलासा! इंडिगो विमानाची इमरजेंसी लँडिंग

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राजधानी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर शनिवारी सकाळी मोठा गोंधळ माजला. याठिकाणी विशाखापट्टनमहून येणाऱ्या इंडिगोच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची सूचना मिळाली. या विमानाचं इंजिन फेल झाल्याचं लक्षात घेता एअरपोर्टवर तातडीने आणीबाणी घोषित केली. सकाळी ११ च्या सुमारास या विमानाचं सुरक्षित लँडिंग करण्यात आले, त्यामुळे एक मोठी दुर्घटना टळली.**




### आकाशातून धोक्याचा अलर्ट

- सकाळी १०.५० वाजता बोइंग ७३७-८०० विमान दिल्लीच्या हवाई क्षेत्रात प्रवेश करत होते तेव्हा त्याच्या इंजिनात बिघाड झाल्याचे संकेत मिळाले. इंजिन फेल झाल्यानंतर विमानाचे संतुलन बिघडू शकते आणि हाइड्रोलिक सिस्टमवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते.
- या विमानातील पायलटने प्रसंगावधान राखत तात्काळ दिल्ली एटीसीला संपर्क केला. १०.५३ वाजता दिल्ली एअरपोर्टवर इमरजेंसी घोषित करण्यात आली. त्यानंतर रनवे नंबर २८ हायअलर्टवर ठेवण्यात आला. लँडिंग कुठल्याही विमानासाठी कठीण प्रसंग असतो, कारण तिथे छोटी चूकही जीवघेणी ठरते.

या इमरजेंसी लँडिंगमध्ये ३ प्रमुख जोखीम होत्या. लँडिंगवेळी विमान आधीच कमी वेगात असते. जर इंजिन पूर्णपणे बंद पडले तर विमान धावपट्टीवर आणण्यासाठी पायलटकडे प्रतिक्रिया देण्यासाठी खूप कमी वेळ असतो.

तांत्रिक बिघाड झाल्यास विमानाचे वजन आणि संतुलन राखणे आव्हानात्मक बनते. जर विमान उतरताना संतुलन गमावून बसले तर ते धावपट्टीवरून घसरू शकते.

इंजिन निकामी झाल्यामुळे अनेकदा घर्षण किंवा गळती होते. लँडिंगच्या वेळी टायर आणि धावपट्टी यांच्यातील आघातामुळे निर्माण होणाऱ्या ठिणग्यांमुळे आग लागू शकते. त्यामुळे अग्निशमन दलाच्या गाड्या आधीच तैनात केल्या जातात.

DGCA ने काय म्हटलं?

२८ मार्च २०२६ रोजी इंडिगोचे वेट-लीजवरील बी७३७-८०० (नोंदणी टीसीसीओएन) विमान विशाखापट्टणम ते दिल्ली (६ई-५७९) असा प्रवास करत होते. उड्डाणावेळी कोणत्याही कमांडशिवाय क्रमांक १ चे इंजिन बंद पडले. तीव्र कंपनांमुळे

### सुरक्षित लँडिंग

या विमानाच्या लँडिंगवेळी १६१ प्रवासी श्वास रोखून होते, परंतु पायलटचं कौशल्य आणि एटीसीसोबतच्या अचूक समन्वयामुळे विमान सकाळी १०:५४ वाजता रनवे २८ वर सुरक्षितपणे उतरले. सर्व यंत्रणा सतर्क असल्याने विमान थांबताच रुग्णवाहिका आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आणि सर्वांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

क्रमांक १ चे इंजिन निकामी झाले. विमानात सीएफएम-५६ इंजिन बसवलेले आहे. त्यानंतर एअरपोर्टवर आणीबाणी जाहीर करण्यात आली आणि विमान सुरक्षितपणे उतरले. विमान तपासणी आणि आवश्यक दुरुस्तीसाठी पाठवण्यात आले आहे असं डीजीसीएने एक निवेदन जारी करून म्हटले आहे.

दरम्यान, एका संसदीय स्थायी समितीने नुकताच अहवाल दिला आहे त्याचवेळी ही घटना घडली. भारतातील ५०% व्यावसायिक विमानांमध्ये तांत्रिक दोष आहेत. विशेषतः बोईंग ७३७ ची इंजिने जागतिक स्तरावर बारकाईने तपासली जात आहेत. गेल्या महिन्यात याच मॉडेलच्या स्पाईसजेटच्या विमानाचे इंजिनही निकामी झाले होते, ज्यामुळे हा तांत्रिक दोष एक मोठी सिस्टम त्रुटी असू शकते याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले.

# सुभानचे सिनेसृष्टीत पदार्पण...



आजवर हिंदी सिनेसृष्टीत बऱ्याच कलाकारांच्या मुलांनी आई-वडिलांचा वारसा चालवत अभिनयात यशस्वी करिअर घडवले आहे. आता निर्माते साजिद नाडियादवाला यांचा मुलगा सुभानही सिनेसृष्टीत आपले नशीब आजमावण्यासाठी सज्ज झाला आहे. घरात सिनेनिर्मितीचे वातावरण असल्याने बालपणापासूनच सुभानला अभिनयाचे वेड लागले. घरी मोठमोठ्या स्टार्सचा वावर असल्याने, त्यानेही बालपणापासून स्टार बनण्याचे स्वप्न पाहिले आहे. अभिनेता बनण्याचे सुभानचे स्वप्न साकार झाले आहे. शशांक खेतान यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणाऱ्या 'ऐसी दिवानगी' या आगामी चित्रपटाद्वारे सुभान सिनेसृष्टीत दाखल होणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले आहे. साजिद यांच्या पहिल्या पत्नी दिव्या भारती यांच्या स्मरणार्थ या चित्रपटाचे शीर्षक 'ऐसी दिवानगी' ठेवण्यात आल्याचे समजते.

# मी त्याला महत्त्व देत नाही



गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्री मलायका अरोराचे नाव अभिनेता सोराब बेदीसोबत जोडले जात आहे. मात्र, या केवळ अफवा असून, आम्ही चांगले मित्र आहोत, असे सोराबने स्पष्ट केले होते. आता मलायकानेही या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत ती म्हणाली की, कधी कधी हे त्रासदायक वाटते, पण आता मी ते विनोदाने घेते. मी त्याला फारसे महत्त्व देत नाही. अशा अफवांवर ती आणि तिचा मुलगा अरहान खान खूप हसतात, असेही तिने सांगितले. एका पार्टीमध्ये दोघांचा एक कोजी व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यात सोराब मलायकाला मिठी मारून डान्स करताना दिसले, तेव्हापासून दोघांच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आले आहे.

# 'धुरंधर' गर्लची नवी भरारी

दिग्दर्शक आदित्य धर यांच्या 'धुरंधर' या चित्रपटामुळे प्रकाशझोतात आलेली अभिनेत्री सारा अर्जुन सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या'धुरंधर २' या सिक्वलला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतानाच, साराला एका बिग बजेट प्रोजेक्टची संधी मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सारा अर्जुन आता प्रसिद्ध निर्माती-दिग्दर्शिका झोया अख्तर यांच्या 'टायगर बेबी' या बॅनरखाली तयार होणाऱ्या आगामी चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटामध्ये सारा अभिनेता ईशान खट्टरसोबत स्क्रीन शेअर करणार असल्याचे समजते. अर्जुन वरैन सिंग या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत; परंतु अद्याप मात्र याबाबत झोया अख्तर किंवा सारा अर्जुनकडून कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही.



# अपघातानंतर टायगर वुड्सला अटक; नशेच्या संशयावरून कारवाई...

## ओव्हरटेक करताना गाडी पलटी; युरिन टेस्ट देण्यास नकार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**जगप्रसिद्ध गोल्फपटू टायगर वुड्सला फ्लोरिडा कार अपघातानंतर अटक करण्यात आली आहे. १५ वेळा मेजर चॅम्पियनशिप जिंकणाऱ्या वुड्सवर मालमत्तेचे नुकसान करणे, अपघातानंतर युरिन टेस्टला नकार दिल्याचा आरोपही असल्याची माहिती मार्टिन काउंटी शेरीफ कार्यालयाने माध्यमांना दिली.**

शेरीफ जॉन बुडेन्सिएक यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, वुड्सच्या लँड रोव्हर गाडीने शुक्रवारी (दि.२७ मार्च) दुपारी ज्युपिटर आयलंडवर एका ट्रकला ओव्हरटेक करताना धडक दिली. त्यानंतर कार पलटी झाली. त्याच्या देहबोलीवरुन तो नशेत असावा असे जाणवत होते.

अपघातानंतर ५० वर्षीय टायगर वूड्स प्रवासी गेटच्या बाजूने रांगत बाहेर पडला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहेचून त्याला ताब्यात घेतले. मार्टिन काउंटी जेलमध्ये त्याची 'ब्रीथ अनालायझर' चाचणी करण्यात



आली, ज्यामध्ये त्याने मद्यपान केले नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र, तपास अधिकाऱ्यांच्या मते वूड्सची प्रकृती अमली पदार्थ किंवा औषधांच्या प्रभावामुळे बिघडलेली असू शकते. यानंतर वूड्सने त्याची 'युरिन टेस्ट' (लघवीची चाचणी) देण्यास नकार दिला. फ्लोरिडाच्या कायद्यानुसार चाचणी नाकारणे हा स्वतंत्र गुन्हा मानला जातो.

### आठ तास कोठडीत, नंतर जामिनावर सुटका

या अपघातातील सर्वात सकारात्मक बाब म्हणजे टायगर वूड्स किंवा दुसऱ्या वाहनाच्या चालकाला कोणतीही दुखापत झालेली नाही. वूड्सवर अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली गाडी चालवणे, मालमत्तेचे नुकसान करणे आणि कायदेशीर चाचणीस नकार देणे असे आरोप ठेवण्यात आले आहेत. फ्लोरिडाच्या कायद्यानुसार, वूड्सला किमान आठ तास तुरुंगात राहावे लागेल, त्यानंतर त्याला जामिनावर सोडण्यात आले.

## RCBचा 'विराट' शो!



कोहली- पडिक्कलच्या अर्धशतकाच्या बळावर हैदराबादवर मिळवला दमदार विजय

# CSK ला मोठा धक्का! धोनी दोन आठवडे नाही खेळणार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ स्पर्धेला कालपासून सुरुवात झाली आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद हे दोन्ही संघ आमनेसामने आले. तर ३० मार्चला होणाऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा सामना राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध होणार आहे. या सामन्याआधी चेन्नई सुपर किंग्ज संघाला मोठा धक्का बसला आहे. दुखापतीमुळे एमएस धोनी सुरुवातीचे दोन आठवडे खेळू शकणार नाही.**



स्पर्धा सुरू होण्याआधी धोनीने कसून सराव केला होता. त्याचे सराव करतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. मात्र आता तो आयपीएल २०२६ स्पर्धेतील सुरुवातीचे दोन आठवडे खेळू शकणार नसल्याने चेन्नई सुपर किंग्ज संघाला त्याच्याशिवाय मैदानात उतरावे लागणार आहे. चेन्नई सुपर किंग्जने अधिकृत सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत धोनीच्या दुखापतीबाबत माहिती दिली आहे.

चेन्नई सुपर किंग्जच्या माहितीनुसार, धोनीच्या पायाच्या स्नायूंना दुखापत झाली असून तो सध्या पुनर्वसन प्रक्रियेत आहे. त्यामुळे तो स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात संघाबाहेर राहणार आहे. "गेट वेल सून.. थाला.." असा संदेश देत संघाने पोस्ट शेअर केली आहे.

काही दिवसांपूर्वी सरावादरम्यान धोनी लंगडताना दिसल्याचा व्हिडिओही समोर आला होता. आता त्याच्या दुखापतीची अधिकृत पुष्टी झाल्याने चाहत्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. धोनी दोन आठवडे संघाबाहेर राहणार असून त्याच्या जागी संजू सॅमसन यष्टीरक्षकाची भूमिका पार पाडणार आहे. आयपीएलपूर्वी झालेल्या ट्रेडनंतर सॅमसनने चेन्नई संघात प्रवेश केला होता. तर रवींद्र जडेजाने राजस्थान रॉयल्स संघात प्रवेश केला आहे.

दरम्यान, संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी ऋतुराज गायकवाड याच्याकडे असणार आहे. धोनीच्या अनुपस्थितीत चेन्नई सुपर किंग्जची कामगिरी कशी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### धोनीच्या दुखापतीमुळे चेन्नईसमोर आव्हान

एमएस धोनीच्या दुखापतीमुळे चेन्नई सुपर किंग्जला सुरुवातीच्या सामन्यांत मोठा फटका बसणार असून यष्टीरक्षणासाठी संजू सॅमसनवर जबाबदारी येणार आहे, तर नेतृत्व ऋतुराज गायकवाडकडे राहणार असल्याने धोनीशिवाय संघाची कामगिरी कशी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 29 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सेवाकर भरणा सुलभ व्हावा यासाठी ही विशेष व्यवस्था

# झोपडपट्टी सेवाकराच्या माध्यमातून १७ लाख ३५ हजार रुपयांची वसुली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १७ एप्रिल २०२५ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत ९७ लाख ३५ हजार ६६० रुपयांचा झोपडपट्टी सेवाकर वसूल झाला आहे. चालू आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२६ रोजी संपणार असून, तोपर्यंत नागरिकांच्या सोयीसाठी झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे कार्यालय साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे.**



सेवाकर भरणा सुलभ व्हावा आणि नागरिकांची गैरसोय टळावी यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तरी झोपडपट्टीवासीयांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला सेवाकर तात्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली करदात्यांना ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने झोपडपट्टी सेवाकर भरण्याची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षातील झोपडपट्टी सेवाकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभागाकडून विशेष नियोजन करण्यात आले असून, नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन स्वरूपात सेवाकर भरता येणार आहे. तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सेवाकर भरण्यासाठी विभागाचे कार्यालय सुरू राहणार आहे, अशी माहिती उपायुक्त अण्णा बोदडे यांनी दिली आहे.

> झोपडपट्टी सेवाकर वसुलीमध्ये पारदर्शकता आणि सुलभता यावर विशेष भर देण्यात आला आहे. ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही माध्यमांतून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी शेवटच्या क्षणाची गर्दी टाळून उपलब्ध सुविधांचा लाभ घेत वेळेत सेवाकर भरावा आणि यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे कार्यालय साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे.
>
> – डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी सेवाकर वसुलीत झालेली ९५ लाखांहून अधिकची वसुली ही सकारात्मक बाब आहे. नागरिकांना अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देत कर भरणा सुलभ व्हावा, यासाठी साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. झोपडपट्टीवासीयांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला सेवाकर वेळेत भरावा आणि शहराच्या विकासात सहकार्य करावे.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका



# दापोडी ते मार्केट यार्ड पीएमपीएमएलचे महापौरांच्या हस्ते उद्घाटन

## दापोडी येथील क्र. ११ मंत्री निकेतन बस स्टॉप येथून मार्केट यार्डपर्यंत बससेवा नव्याने सुरू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दापोडी येथील क्र. ११ मंत्री निकेतन बस स्टॉप येथून मार्केट यार्डपर्यंत नागरिकांच्या सोयीसाठी नव्याने सुरू करण्यात आलेल्या पीएमपीएमएल बससेवेचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.**





दापोडी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक यांना शहरातील महत्त्वाच्या भागांशी अधिक सुलभ, सुरक्षित आणि परवडणारी प्रवास सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या मार्गामुळे नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला मोठी मदत होणार असून वेळ आणि खर्चाचीही बचत होणार आहे.

या उद्घाटनप्रसंगी शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, नगरसदस्या स्वाती माई काटे, प्रतिक्षा लांघी-जवळकर, नगर सदस्य राजू बनसोडे, अप्पर डेपो मॅनेजर सुनिल दिवाणजी, ट्राफिक मॅनेजर यशवंत हिंगे, समन्वयक गणेश कवठेकर तसेच बसचे चालक मनीष चितल्लू आणि वाहक योगेश जगताप यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करणे, प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना परवडणारी व सुलभ प्रवास सेवा उपलब्ध करून देणे, या दृष्टीने अशा बसमार्गांची सुरुवात अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले.

या मार्गावर बससेवा सुरू झाल्याने विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी विशेष समाधान व्यक्त करत या उपक्रमाचे स्वागत केले. परिसरातील नागरिकांकडून या बससेवेची मागणी दीर्घकाळापासून करण्यात येत होती. अखेर ही सेवा सुरू झाल्याने स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या नव्या बसमार्गामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे महापौरांनी सांगितले.

> पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि परवडणारी सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. दापोडी ते मार्केट यार्ड या नव्या बसमार्गामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, भविष्यातही अशा नागरिकाभिमुख सुविधांना प्राधान्य दिले जाईल.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका

# इंटर झोनल मैदानी स्पर्धांमध्ये पीसीपीच्या दिनेश फड आणि रिद्धीश्री वानागुट्टे यांची उत्तुंग कामगिरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**इंटर इंजिनियरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन आणि शासकिय तंत्रनिकेतन पुणे यांच्या वतीने तंत्रनिकेतन विद्यालयांच्या इंटर झोनल मैदानी स्पर्धा सणस क्रिडा संकुल, पुणे येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन महाविद्यालय (पीसीपी) संघाने ९ पैकी ५ क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट यश संपादन केले.**

दिनेश फड या विद्यार्थ्याने लांब उडी, उंच उडी आणि तिहेरी उडी या क्रिडा प्रकारांत पहिला क्रमांक पटकावला.

मुलींमध्ये रिद्धीश्री वानागुट्टे हिने ४०० व ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या संघाला प्राचार्य डॉ. विद्या बॅकॉड, संघ व्यवस्थापक राहुल चव्हाण, कुणाल गव्हाणे, अविनाश जगदेव, अतुल सावळे, पुनम तेरणीकर, मोनिका चिपरीकर, शिल्पा गिटमे, क्रिडा समन्वयक सुनिल जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थकुरडे यांनी मार्गदर्शन केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.







# गर्भपाताच्या गोळ्यांनंतर तरुणी व नवजात बाळाचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. गर्भपाताच्या गोळ्या घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होऊन एका 22 वर्षीय अविवाहित तरुणीचा आणि तिच्या सात महिन्यांच्या नवजात बाळाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून चिंचवड पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी सात महिन्यांची गरोदर होती. मात्र याबद्दल तिच्या कुटुंबीयांना कोणतीही माहिती नव्हती. मंगळवारी सकाळी तिने गर्भपाताच्या गोळ्या घेतल्यानंतर तिची मुदतपूर्व प्रसूती झाली. प्रसूतीनंतर तिला प्रचंड रक्तस्त्राव सुरू झाल्याने तिची प्रकृती गंभीर झाली. त्यानंतर तिला तातडीने पुण्यातील ससून रुग्णालयात हलवण्यात आले. दुसरीकडे, नवजात बाळाला पिंपरीतील वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान काही तासांतच दोघांचाही मृत्यू झाला.


या प्रकरणात अनेक संशयास्पद बाबी समोर येत आहेत. तरुणीचा मोबाईल फोन फॉरमॅट केलेल्या अवस्थेत आढळल्याने पोलिसांचा संशय अधिकच बळावला आहे. या तरुणीला गर्भपाताच्या गोळ्या कोणी पुरवल्या, तिच्या मोबाईलमधील डेटा कोणी आणि का नष्ट केला, तसेच यामागे कोणाचे दडपण होते का, या सर्व बाबींचा तपास चिंचवड पोलीस करत आहेत.

# 'महापालिका अभय योजने'ला मुदतवाढ द्या!

## नगरसेवक उदय गायकवाड यांची मागणी; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**





उदय लता दत्तात्रय गायकवाड
नगरसेवक
सदस्य : साहित्य, क्रीडा, कला व सांस्कृतिक समिती
सरचिटणीस : भाजप युवा मोर्चा पिं.चिं. शहर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

मनपा : ०२०-६७३३३३३३ (वि- १२०७)
कार्यालय : ०२०-२७४२४९४१
टेलिफॅक्स : ०२०-२७४२५६०० (मनपा)
मोबा. : ७३९३९९९७३९

संपर्क कार्यालय : उदय गायकवाड जनसंपर्क कार्यालय, शिवदत्त निवास, कॉटन किंग शेजारी, दिघी-आळंदी रोड, दिघी, पुणे- ४११०१५

दिनांक २७/०३/३/२०२६

जावक क्रं : ००८/२६.

मा.आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे १८.

**विषय : अभय योजनेमध्ये मुदत वाढ करणेबाबत**

मा.महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती अशी की, महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येत असलेली अभय योजना ही नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. अनेक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला असून मिळकत कर भरण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

परंतु काही नागरिकांना योजनेचा उशीरा झालेला प्रसार किंवा काही कारणांमुळे (आर्थिक अडचणी, माहितीचा या योजनेचा लाभ निश्चित कालावधीत घेता आलेला नाही. त्यामुळे अजूनही अनेक नागरिक या योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी व महानगरपालिकेच्या महसुलात वाढ होण्याच्या दृष्टीने अभय योजनेस किमान एप्रिल २०२६ अखेर कालावधीची मुदतवाढ देण्यात यावी, अशी आपणांस नम्र विनंती आहे.

आपण या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून योग्य तो निर्णय घ्याल, ही अपेक्षा.

प्रति आणि अधिक माहितीसाठी
मा.महापौर पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

आपला नम्र,
उदय दत्तात्रय गायकवाड
मा. नगरसेवक

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणारी अभय योजना ही नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक ठरत असताना, या योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी विद्यमान नगरसेवक उदय गायकवाड यांनी पुढाकार घेतला आहे.**

त्यांनी नुकतेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच महापौर रवी लांडगे यांना याबाबत निवेदन देत, अभय योजनेच्या कालावधीत किमान एप्रिल २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नगरसेवक उदय गायकवाड यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, महानगरपालिकेच्या थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येणारी अभय योजना नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे. या योजनेमुळे अनेक नागरिकांनी पुढे येत मिळकत कर भरण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, महानगरपालिकेच्या महसुलातही वाढ होत आहे.

मात्र, काही नागरिकांना योजनेची माहिती उशिरा मिळाल्याने, तसेच काहींना आर्थिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे ठरावीक कालावधीत या योजनेचा लाभ घेता आलेला नाही. त्यामुळे आजही मोठ्या संख्येने नागरिक अभय योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी आणि महानगरपालिकेच्या महसुलवाढीच्या दृष्टीने अभय योजनेला मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करत, एप्रिल २०२६ अखेरपर्यंत ही योजना सुरू ठेवावी, अशी ठाम मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची अभय योजना ही सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारी योजना आहे. या योजनेमुळे अनेक नागरिकांनी थकबाकी कर भरण्यास पुढाकार घेतला असून, महापालिकेच्या महसुलातही सकारात्मक वाढ झाली आहे. नागरिकांच्या हिताचा विचार करून आणि महानगरपालिकेच्या आर्थिक बळकटीसाठी अभय योजनेस एप्रिल २०२६ अखेर मुदतवाढ मिळावी, यासाठी आम्ही आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत आहे.
>
> **– उदय गायकवाड, नगरसेवक, पिं. चिं. मनपा.**

# नॅशनल हेल्थ क्लेम एक्सचेंज स्पर्धेत पीसीसीओइचा प्रथम क्रमांक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण यांच्या वतीने आयआयटी, हैदराबाद येथे आयोजित केलेल्या “नॅशनल हेल्थ क्लेम एक्सचेंज हॅकॅथॉन २०२६ ॲक्सिलरेटिंग हेल्थ क्लेम्स जर्नी” या स्पर्धेत पीसीसीओइच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावला आणि पाच लाख रुपयांचे बक्षीस मिळवले. या टीम मध्ये तृतीय वर्ष विद्यार्थी अभिषेक निकम, तृप्ती सुकाळे, कोसदा भट आणि द्वितीय वर्ष विद्यार्थी हर्षिल बियाणी व अंश दुधे यांचा समावेश होता.**




पीसीसीओई चे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, विभाग प्रमुख डॉ. अनुराधा ठाकरे, सह प्राध्यापक डॉ. सांत्वना गुडधे यांनी मार्गदर्शन केले.

ही स्पर्धा हैदराबाद येथे राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण द्वारा आयआयटी हैदराबाद, एनआरसीइएस, जनरल इन्शुरन्स कौन्सिल, गुगल, इंडिया इन्सुरटेक असोसिएशन आणि एनएचसीएक्स यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा देशभरातील नवोन्मेषक, स्टार्टअप्स आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन भारताच्या आरोग्यसेवा डिजिटल मध्ये परिवर्तित करून त्यांना बळकटी देणे हा उद्देश होता.

यामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओइ) कॉम्प्युटर एआय एमएल विभागातील विद्यार्थ्यांनी देशभरातील प्रतिभावान स्टार्टअप्सशी स्पर्धा करून “प्रोब्लेम सॉलविंग ३” या विभागात ५,००,००० रोख बक्षीसा सह प्रथम क्रमांक पटकावला. या टीमने ‘क्लेमसिंक एआय’ नावाचा एक नाविन्यपूर्ण उपाय विकसित केला. यामध्ये जटिल आणि असंरचित आरोग्य विमा कागदपत्रांना संरचित, इंटर ऑपरेबल डिजिटल डेटामध्ये रूपांतरित करण्यासाठी डिझाइन केलेला प्लॅटफॉर्म आहे. या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत पीसीसीओईला प्रतिनिधित्व करण्याची संधी आणि प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळणे हा एक समृद्ध अनुभव आहे असे पीसीसीओई चे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.

यशस्वी टीम आणि मार्गदर्शकांचे पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओइचे संचालक व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.


DR. SUSHANT PATIL
GROUP
seamedu
Industry Aligned | Future Defined
Build Your Creative Career with a
University Degree in
Media & Design
ADMISSIONS OPEN
2026-2027
+91 9225088657
www.seamedu.com